विशेष दि. दावा क्र.४ / २०२३
(जुना विशेष दि. दावा क्र.३२ / २०१४)
शिवाजी सुर्यवंशी वि. प्रताप पाटील व इतर

**नि.क्र. १२९**

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. ७**

**शपथेवर सुरू:–**

नाव – विजयसिंग बगतावरसिंग शिलेदार,

वय – ७१ वर्ष व्यवसाय – सेवानिवृत्त,

राहणार – लातूर ता.जि. लातूर.

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. ७ चा सरतपास विधिज्ञ श्री. एच.आर. पाठक यांचेतर्फे –**

१. मी महसुल खात्यातून सेवानिवृत्त झालो. मी महसुल खात्यामध्ये नायब तहसीलदार होतो. मी औसा येथे सन १९९७–१९९८ पासून २००८ पर्यंत मंडळ अधिकारी म्हणुन कार्यरत होतो. प्रतिवादी क्र. १ यांनी तहसील कार्यालय, औसा येथे वहिती बाबत दिनांक २७.०८.२००७ रोजी माझ्याकडे अर्ज दिला होता. अर्जानुसार मी त्या गटाच्या शेजारीपाजारी यांना व सर्व संबंधितांना लेखी नोटीसा दिल्या. नोटीसीप्रमाणे त्यांना स्थळ पाहणी साठी हजर रहावे असे सुचविले. मी स्थळ पाहणी साठी दिनांक ०३.०९.२००७ रोजी जायमोक्यावर गेलो. मी गट क्र. १७२ व गट क्र. २६६ मध्ये गेलो. मी स्थळ पाहणीचा पंचनामा केला. मी त्याठिकाणी वहितीबाबत चौकशी केली. मी प्रतिवादी क्र. १ यांनी अर्ज दिला होता व त्यासंदर्भात मी पंचनामा केला होता त्याची मुळ संचिका मी माझ्यासोबत आज रोजी आणली आहे. यादी नि.क्र.

२८ सोबत अनुक्रमांक १ वरील पंचनामा मला दाखवला असता तो मी आणलेला संचिकेमधील मुळ पंचनाम्याप्रमाणे बरोबर आहे. सदर पंचनामा मी लिहीला आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मुळ पंचनाम्याप्रमाणे बरोबर आहे. सदर पंचनाम्याच्या प्रतीस नि.क्र. १३० देण्यात आले. मी त्यादिवशी जमीन मुळ मालक चांगुनाबाई डिग्रसे व प्रतिवादी क्र. १ चे जबाब नोंदविले. मी आणलेल्या संचिकेमध्ये चांगुनाबाई डिग्रसे व प्रतिवादी क्र. १ चा जबाब आहे. सदर जबाब मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवून घेतले होते. त्यावर चांगुनाबाई यांचा अंगठा व समक्ष म्हणुन सुशिलाबाई यांची सही आहे. सदर जबाबावर माझी सही आहे. मला यादी नि.क्र. १२८ सोबत अनुक्रमांक २ वरील जबाबाची प्रत दाखवली असता ती मुळ जबाबाप्रमाणे बरोबर आहे. सदर जबाबास नि.क्र. १३१ देण्यात येते. तसेच मी प्रतिवादी क्र. १ यांचा जबाब त्याचदिवशी नोंदवला त्यावर प्रतिवादी क्र. १ यांची सही आहे व माझी सही आहे. यादी नि.क्र. १२८ सोबत अनुक्रमांक ३ वर दाखल केलेल्या जबाबाची प्रत मला दाखवली असता ती मुळ जबाबाप्रमाणे बरोबर आहे. त्यास नि.क्र. १३२ देण्यात येते.

२. त्यादिवशी मी विठ्ठल केरबा भोईभार यांचा जबाब नोंदवला. विठ्ठल केरबा भोईभार हे वादग्रस्त जमिनीच्या दक्षिण बाजूचे शेजारी आहेत. सदर जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे मी नोंदवला. त्यावर विठ्ठल केरबा भोईभार यांची व माझी सही आहे. मला यादी नि.क्र. १२८ सोबत अनुक्रमांक ४ वर दाखल केलेला जबाबाची प्रत दाखवली असता ती मुळ जबाबाप्रमाणे बरोबर आहे. त्यास नि.क्र. १३३ देण्यात येते. त्यानंतर मी ज्ञानोबा पांडुरंग मुकादम यांचा जबाब नोंदवला. ज्ञानोबा पांडुरंग मुकादम हे वादग्रस्त जमिनीच्या पश्चिम

बाजूचे शेजारी आहेत. सदर जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे मी नोंदवला. त्यावर ज्ञानोबा पांडुरंग मुकादम यांची व माझी सही आहे. मला यादी नि.क्र. १२८ सोबत अनुक्रमांक ५ वर दाखल केलेला जबाबाची प्रत दाखवली असता ती मुळ जबाबाप्रमाणे बरोबर आहे. त्यास नि.क्र. १३४ देण्यात येते. त्यानंतर मी बबन गंगाराम डिग्रसे यांचा जबाब नोंदवला. बबन गंगाराम डिग्रसे हे वादग्रस्त जमिनीच्या पुर्व बाजूचे शेजारी आहेत. सदर जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे मी नोंदवला. त्यावर बबन गंगाराम डिग्रसे यांची व माझी सही आहे. मला यादी नि.क्र. १२८ सोबत अनुक्रमांक ६ वर दाखल केलेला जबाबाची प्रत दाखवली असता ती मुळ जबाबाप्रमाणे बरोबर आहे. त्यास नि.क्र. १३५ देण्यात येते.

३. मी त्याचदिवशी गट क्र. २६६ चा पंचनामा केला. सदरचा पंचनामा मी लिहीला आहे. सदर पंचनाम्याला सहा पंच हजर होते. सदर पंचनाम्यावर त्यांनी सह्या केल्या. यादी नि.क्र. १२८ सोबत अनुक्रमांक ७ वर दाखल केलेली पंचनाम्याची प्रत मला दाखवली असता ती मुळ प्रतीप्रमाणे बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास नि.क्र. १३६ देण्यात येते. त्याचदिवशी मी ज्ञानोबा मुकादम यांचा जबाब नोंदवला. ते गट क्र. २६६ च्या उत्तर बाजूचे शेजारी आहेत. सदर जबाब मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे लिहीला. त्यावर ज्ञानोबा मुकादम यांचा अंगठा आहे व माझी सही आहे. यादी नि.क्र. १२८ सोबत अनुक्रमांक ८ वरील जबाबाची प्रत मला दाखवली असता ती मुळ जबाबाप्रमाणे बरोबर आहे. त्यास नि.क्र. १३७ देण्यात येते.

४. दिनांक ०१.०९.२००७ रोजी मला रागिनी डिग्रसे यांच्याकडून प्रतिवादी क्र. १ चे नाव वहितीला लावू नये म्हणुन आक्षेप अर्ज प्राप्त झाला.

त्यानुसार मी शेजारीपाजारी यांना नोटीसा काढल्या. त्यानंतर मी दिनांक १८.०९.२००७ रोजी गट क्र. १७२ मध्ये जायमोक्यावर जाऊन पंचनामा केला. त्याठिकाणी सात साक्षीदार हजर होते व गावचे पोलीस पाटील हजर होते. सदर पंचनाम्यावर सगळ्या साक्षीदारांच्या सह्या आहेत व माझी सही आहे. मला यादी नि.क्र. १२८ सोबत अनुक्रमांक ९ वर दाखल केलेली पंचनाम्याची प्रत मला दाखवली असता ती मुळ प्रतीप्रमाणे बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास नि.क्र. १३८ देण्यात येते. मी त्यादिवशी जमीन मालक चांगुनाबाई यांचा जबाब नोंदवला. सदर जबाब मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे लिहीला. त्यावर चांगुनाबाई यांचा अंगठा आहे व समक्ष म्हणुन मुलगी सुशिलाबाई यांची सही आहे. सदर जबाबावर माझी सही आहे. यादी नि.क्र. १२८ सोबत अनुक्रमांक १० वर दाखल केलेली जबाबाची प्रत मला दाखवली असता ती मुळ प्रतीप्रमाणे बरोबर आहे. त्यास नि.क्र. १३९ देण्यात येते.

५. मी त्यादिवशी बबन गंगाराम डिग्रसे यांचा जबाब नोंदवला. बबन डिग्रसे हे गट क्र. १७२ चे पुर्व बाजुचे शेजारी आहेत. मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे जबाब नोंदवला. त्यावर त्यांची सही आहे व माझी सही आहे. यादी नि.क्र. १२८ सोबत अनुक्रमांक ११ वर दाखल केलेली जबाबाची प्रत मला दाखवली असता ती मुळ जबाबाप्रमाणे बरोबर आहे. त्यास नि.क्र. १४० देण्यात येते. मी त्यादिवशी विठ्ठल केरबा भोईभार यांचा जबाब नोंदवला. ते गट क्र. १७२ च्या दक्षिण बाजूचे शेजारी आहेत. मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांचा जबाब नोंदवला. त्यावर त्यांची व माझी सही आहे. यादी नि.क्र. १२८ सोबत अनुक्रमांक १२ वर दाखल केलेली जबाबाची प्रत मला दाखवली असता ती मुळ जबाबा प्रमाणे बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास नि.क्र. १४१ देण्यात येते. मी

त्यानंतर प्रतिवादी क्र. २ यांचा जबाब नोंदवला. ते गट क्र. १७२ च्या पश्चिम बाजूचे शेजारी आहेत. मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांचा जबाब नोंदवला. त्यावर त्यांची व माझी सही आहे. यादी नि.क्र. १२८ सोबत अनुक्रमांक १३ वर दाखल केलेली जबाबाची प्रत मला दाखवली असता ती मुळ जबाबाप्रमाणे बरोबर आहे. त्यास नि.क्र. १४२ देण्यात येते. त्यानंतर मी गट क्र. २६६ चा पंचनामा दिनांक १८.०९.२००७ रोजी केला. त्यावेळी त्याठिकाणी पाच साक्षीदार हजर होते व एक पोलीस पाटील हजर होते. सदर पंचनाम्यावर पाच साक्षीदारांच्या सह्या आहेत, पोलीस पाटलाची सही आहे व माझी सही आहे. यादी नि.क्र. १२८ सोबत अनुक्रमांक १४ वर दाखल केलेली पंचनाम्याची प्रत मला दाखवली असता ती मुळ पंचनाम्याप्रमाणे बरोबर आहे. त्यास नि.क्र. १४३ देण्यात येते.

६. त्यादिवशी मी चांगुनाबाई डिग्रसे यांचा जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदवला. त्यावर त्यांचा अंगठा आहे व मुलगी सुशिलाबाई यांची समक्ष म्हणुन सही आहे व त्यावर माझी सही आहे. यादी नि.क्र. १२८ सोबत अनुक्रमांक १५ वर दाखल केलेली जबाबाची प्रत मला दाखवली असता ती मुळ जबाबाप्रमाणे बरोबर आहे. त्यास नि.क्र. १४४ देण्यात येते. त्यानंतर मी दिनांक २०.०९.२००७ रोजी तहसीलदार,औसा यांच्याकडे अहवाल सादर केला. अहवालासोबत मी सर्व कागदपत्रे दाखल केली. सदर अहवालावर माझी सही आहे. मला यादी नि.क्र. १२८ सोबत अनुक्रमांक १६ वर दाखल केलेल्या अहवालाची प्रत दाखवली असता ती मुळ अहवालाप्रमाणे बरोबर आहे. सदर अहवालास नि.क्र. १४५ देण्यात येते. (प्रतिवादी क्र.२ तर्फे वकीलांनी सर्व कागदपत्रे साक्षांकित किंवा सत्यप्रत व त्यावर तारीख नसल्याने

त्यास निशाणी देता येत नाही असा आक्षेप घेतला. साक्षीदारांनी त्यांच्यासोबत मुळ संचिका आणली असल्याने व त्यामध्ये मुळ कागदपत्रे बघून निशाणी क्र. १२८ च्या यादीसोबत दाखल केलेले कागदपत्रे ओळखले असल्याने त्या कागदपत्रांना निशाणी देण्यात येते.)

**सरतपास पुर्ण.**

**प्रतिवादी क्र. २ तर्फे वकीलांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुल करण्यात आला.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PARVEZ ISHAQUEKHAN MOKASHI
Date: 2025.11.05 13:32:44 +0530

(पी. आय. मोकाशी)

दिनांकः–०४.११.२०२५ दिवाणी न्यायाधीश,व. स्तर, औसा.